**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३५६ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. सुरेश माणिकराव भारसाकळे,
ग्रामसेवक, पंचायत समिती, अमरावती,
जि.अमरावती.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अमरावती.
२. जन माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद, अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. सुरेश माणिकराव भारसाकळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, अमरावती श्री.बि.जी. सोमवंशी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), (सा.), जिल्हा परिषद, अमरावती श्री.प्रमोद ताडे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ३० एप्रिल २००४ च्या शासन पत्राला अनुसरुन जे सर्व पत्र जिल्हा परिषदेला दिले आहे व दिनांक २२ एप्रिल २००८ च्या पत्रानुसार व विभागीय आयुक्त यांचे २ जुन २००५ च्या पत्रानुसार उत्तरवादी यांनी औद्योगिक न्यायालयाचा आदेश व सध्या बनविलेल्या ज्येष्ठता यादीची प्रत अर्जदाराला उद्या कार्यालयीन वेळेत पुरविण्यात यावी तसेच अर्जदाराचे दिनांक १२/१२/०९ नुसार मागितलेली माहिती व त्यावरील स्पष्टीकरण अर्जदाराला उपलब्ध करुन अर्जदाराची पोच घ्यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३५८ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. गंगाधर जगतराव जवंजाळ,
कृषी उत्पन्न बाजार समिती, (एपीएमसी) गेट समोर,
गुलाबबाग रोड, अचलपुर, ता.अचलपुर,
जि.अमरावती.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (सांख्यिकी),
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. गंगाधर जगतराव जवंजाळ हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.), जिल्हा परिषद, अमरावती श्री.बि.जी. सोमवंशी हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), (सा.), जिल्हा परिषद, अमरावती श्री.प्रमोद ताडे हे हजर आहेत.

अर्जदाराच्या मानीव दिनांका बाबत विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक ०६/१२/२००९ रोजी जो आदेश पारित केला त्या अनुषंगाने उत्तरवादी यांचे स्तरावर जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो ४ आठवडयाच्या आंत घेण्यात यावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३६०/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. जाकीर बिसमिल्ला शाह,
जिल्हा अध्यक्ष, म.मु. शाह छप्परबंद संघर्ष समिती,
मु.पो. नांद्रा कोळी, ता.जि. बुलडाणा.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, गेवराई,
ता.गेवराई, जि.बिड.

२. जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय,
गेवराई, ता.गेवराई, जि.बिड.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. जाकीर बिसमिल्ला शाह हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

तहसिलदार तथा अपिलीय अधिकारी हे आज सुनावणीकरिता गैरहजर असुन त्यांनी हया आयोगासमोर पत्र देवुन सदर प्रकरणात पुढील तारीख मागितलेली आहे. त्यांचे म्हणण्यानुसार अधिवेशन चालु असल्यामुळे व एलएक्यु असल्याने सुनावणी हजर राहणे शक्य नाही त्यामुळे पुढील तारीख मागितलेली आहे. परंतु अर्जदाराच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणात माहिती दिलेली नाही व प्रपत्र ‘ब’ नुसार प्रथम अपिल दिनांक १६/११/२००९ ला दाखल केले आहे. त्यावर अद्याप निर्णय मिळालेला नाही. तरी, सदर प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवुन अर्जदार व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन निर्णय घेण्यात यावा. प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निर्णयानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार ९० दिवसात हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३५९ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. मंगेश प्रभाकरराव यमतकर,
'वात्सल्यप्रभा' वार्ड नं. ६, वैभवनगरी,
लोहारा, ता.जि. यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
पंचायत विभाग, पंचायत समिती,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, श्री.एस.डी. जुगनाके हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, पंचायत विभाग, पंचायत समिती, यवतमाळ श्री.पी.जी. शेंडे हे हजर आहेत.

त्यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला दिनांक २२/०१/२०१० ला रजिष्टर पोष्टाने विनाशुल्क माहिती पाठविण्यात आली आहे. परंतु अर्जदार हे घरी न भेटल्यामुळे ती माहिती परत आली. दिनांक ०९/०४/२०१० चे पारित आदेशानुसार विस्तार अधिकारी (पंचायत), वरिष्ठ सहाय्यक आस्था (पंचायत) यांना दिनांक २६/०४/२०१० च्या पत्राने अर्जदारास १५ दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशीत करण्यात आले. तत्पुर्वी दिनांक २१/०४/२०१० रोजी पुन्हा अर्जदाराला माहिती पाठविण्यात आली.

अर्जदाराला माहिती मिळाल्यामुळे अर्जदार गैरहजर राहिले असावे असा निष्कर्ष काढण्यात येतो व सदरचे अपिल खारिज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३६२/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. राजु भाष्कर माधने,
राणी लक्ष्मीबाई वार्ड क्र-३,
पांढरकवडा, ता.केळापुर, जि.यवतमाळ.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यपालन अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ.
२. जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, यवतमाळ श्री.डि.जे. रामटेके हे हजर आहेत.

शिक्षणाधिकारी (प्राथ.) श्री.डि.जे. रामटेके यांच्या म्हणण्यानुसार सदर प्रकरणात प्रथम अपिल दाखल झाले परंतु त्यावर सुनावणी घेवुन निकाली काढलेले दिसत नाही. अर्जदार यांनी दिनांक २६/०२/२०१० ला व्दितीय अपिल दाखल केले व त्यात कोणतीही माहिती न दिल्याचे कारण दिले आहे. तरी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदाराचे प्रपत्र 'ब' दिनांक ०७/११/२००९ नुसार दाखल केलेले प्रथम अपिल सदर आदेश मिळाल्यापासुन ४ आठवडयाच्या अर्जदार तथा अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांची सुनावणी घेवुन व माहिती न दिल्याबद्दल जबाबदारी निश्चित करुन अर्जदाराला त्यांचे समक्ष माहिती उपलब्ध करुन प्रथम अपिल निकाली काढावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३६३ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. रमेश किसनराव ठाकरे,
गुजराथी पुरा बाळापुर, ता.बाळापुर,
जि.अकोला.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
बाळापुर, ता.बाळापुर, जि.अकोला.
२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत काझीखेड,
ता.बाळापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे विस्तार अधिकारी (कृषी), श्री.एम.डी. ननीर हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत काळीखेड श्री.बी.एस. गरकल हे हजर आहेत.

सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला दिनांक ०८/०२/२०१० रोजी माहिती पुरविण्यात आली तसेच माहितीचे निरीक्षण सुध्दा दिले होते परंतु त्यांचेकडुन चुकून अर्जदाराची सही घेतलेली नाही, असे सचिव यांचे म्हणणे आहे. तरी, ते अर्जदाराला माहिती पाठविण्यास तयार आहे. तरी, सचिव यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती आजपासुन ८ दिवसाच्या आंत अर्जदाराला व्यक्तीशः किंवा पंजीबध्द डाकेने माहिती पाठवुन त्यांची पोच घेण्यात यावी. माहिती मिळाल्यानंतरही अर्जदाराचे समाधान झाले नाही तर कलम १८ खाली हया आयोगाकडे तक्रार करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३६४ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री. श्रीकांत तुकारामजी निवल,
C/O राम बोंडे, गिरी नगर,
संदीप मंगलम जवळ, यवतमाळ,
जि.यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
अमरावती कार्यालय, अमरावती.

२. जन माहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री.भा.रा. चव्हाण, समाजकल्याण अधिकारी, अमरावती हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे समाजकल्याण निरीक्षक कार्यालय श्री.जी.बी. धोटे हे हजर आहेत.

अर्जदाराने दि.०३/१२/२०१० नुसार पुढील तारीख मिळण्याबाबत विनंती अर्ज केला आहे. परंतु अर्जदाराने हया आयोगासमोर दिनांक ०८/०३/२०१० ला व्दितीय अपिल दाखल केले व अपिल दाखल करण्याचे कारण कोणतीही माहिती देण्यात आली नाही असे म्हटले आहे. अर्जदाराला दिनांक २९/०७/२००९ रोजी माहिती पुरविण्यात आली व त्यावर अर्जदाराची स्वाक्षरी आहे. दिनांक ०२/०१/२०१० च्या पत्रानुसार अर्जदाराला माहिती या पत्राव्दारे देत आहे व माहिती स्विकारुन सहकार्य करावे असे म्हटले आहे व त्यानंतर प्रथम अपिल निकाली काढले. दिनांक ०९/०३/२०१० ला प्रथम अपिल घेण्यात आले व अपिलाच्या सुनावणी करिता अर्जदार हजर होते. दिनांक २६/०३/२०१० पुर्वी माहिती देण्याचा आदेश प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिला व त्यानुसार दिनांक २३/०३/२०१० रोजी माहिती पुरविण्यात येवुन अर्जदाराची स्वाक्षरी घेतली आहे.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराचा पुढील तारिख मिळण्यासाठी केलेला विनंती अर्ज मान्य करता येत नाही कारण अपिलातील कारण फक्त माहिती न दिल्याबाबत आहे व ती माहिती व्दितीय अपिल दाखल केल्यानंतर दिल्याचे सिध्द होते.

वरील बाबी लक्षात घेता सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**

**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.३६५ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. नामदेव नारायण आढाव,
मु.पो. राजुरा (राव), ता.मालेगांव,
जि.वाशिम.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
मालेगांव, जि.वाशिम.

२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत राजुरा (राव),
पंचायत समिती, मालेगांव, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार श्री. नामदेव नारायण आढाव यांचे तर्फे ॲड. श्री.नरेंद्र आढाव रा.मालेगांव हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी श्री.आर.एस. कंकाळ, हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, राजुरा श्री.जे.पी. रंजवे हे हजर आहेत.

सदर प्रकरणात सचिव, ग्रामपंचायत, राजुरा यांनी जी माहिती दिली त्यावर त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपिल दाखल केले. अर्जदाराला ग्रामपंचायत समोर घेतलेला ठराव क्र. ६ व त्यानंतर त्या ठरावाला स्थगिती दिल्याबाबतचा ठराव दिनांक १९/०८/२००९ व माहे सप्टेंबर २००९ च्या सभेचे मुळ प्रोसिडींगची प्रत दाखविण्यात आली. सदर प्रकरणात दिनांक ३१/०७/२००९ च्या ठरावाची झेरॉक्स प्रत अर्जदाराला हवी असल्यास देण्यात यावी.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३५७/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. प्रदिप संतोषसिंह चंद्रवंशी,
साप्ताहिक यवतमाळ गॅझेट, कार्यालय,
पोलीस मुख्यालयासमोर, सिमेंट रोड, यवतमाळ.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
गोंदणी रोड, यवतमाळ, जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
कार्यालय, गोंदणी रोड, यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. प्रदिप संतोषसिंह चंद्रवंशी हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे विस्तार अधिकारी, शिक्षणाधिकारी कार्यालय, यवतमाळ श्री.एस.जी. निकम हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे कनिष्ठ सहाय्यक, यवतमाळ श्री.एस.आर. बोरकर हे हजर आहेत.

सदर प्रकरणात अर्जदाराने दाखल केलेले प्रथम अपिल दिनांक १२/०१/२०१० च्या अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्य.), हे दिनांक २२/१२/२०१० रोजी सुनावणी घेतील. अर्जदाराचे प्रपत्र 'अ' हे संदिग्ध स्वरुपाचे असल्यामुळे अर्जदाराला कोणत्या मुख्याध्यापकांबाबत माहिती पाहिजे हे स्पष्ट नसल्यामुळे अजुनपर्यंत माहिती पुरविण्यात आली नाही. शिक्षणाधिकारी यांचे तर्फे श्री.एस.जी. निकम हे हजर आहेत व ते अर्जदाराने जर मुख्याध्यापकांची यादी दिल्यास त्या यादीबद्दलची माहिती पुरविण्यासाठी तयार आहेत. तरी अर्जदार लेखी यादी दिनांक २२/१२/२०१० ला सुनावणी दरम्यान देतील. सदरची माहिती ही ६-७ मुख्याध्यापक संबंधित आहे. अर्जदाराने मुख्याध्यापकांची यादी दिल्यानंतर त्यानंतर दुस-या तारखेला प्रथम अपिलात माहिती विनाशुल्क पुरवून नियमानुसार योग्य तो निर्णय देण्यात यावा. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास ९० दिवसात हया आयोगासमोर व्दितीय अपिल दाखल करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ३६१/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. रामचंद्र अमरसिंग राठोड,
मु.पो. शेलु(शे.), ता.आर्णि, जि.यवतमाळ.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
गोधनी रोड, यवतमाळ, जि.यवतमाळ.
२. जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, वसंत आदिवासी विदयालय,
पार्डी तस्करी, ता.घाटंजी, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक १५/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. रामचंद्र अमरसिंग राठोड हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे विस्तार अधिकारी, श्री.एस.जी. निकम हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, वसंत आदिवासी विदयालय, पार्डी श्री.डी.डी. राठोड हे हजर आहे.

सदर प्रकरणात अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली आहे. अर्जदाराला जी कार्यवाही अपेक्षित आहे ती माहिती अधिकाराच्या कक्षेत बसत नाही. अर्जदाराला शारीरिक शिक्षकाच्या मुलाखतीसाठी बोलावले असतांना अर्जदाराला डावलुन दुस-याची निवड केल्याबद्दल अर्जदाराची तक्रार आहे. त्यासाठी अर्जदाराला कुठलीही तक्रार असल्यास संबंधित शिक्षण विभागाकडे किंवा न्यायालयाकडे तक्रारीचे निरसन करु शकतात.

यास्तव, सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**